# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०३/२०१८

**१) विद्युत चोरी केल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक १३/०३/२०१८ चे १४.३० ते १५.४० वाजता दरम्यान यातील आरोपी ग्राहक क्र. ७५७५२००००६२८ यांनी विद्युत मिटरच्या टर्मीनल फेस मध्ये टर्मीनल फेस न्युटल टर्मीनल मध्ये मिटरच्या आउट गोइंग फेस व न्युटल टर्मीनल मध्ये पाहीजे असणारे वायर परस्पर टाकुन मिटर बायपास करुन विज चोरी करीत असल्याने फिर्यादी अशोक स्वामीनाथ औझा वय ४८ वर्ष, रा केशव इन्क्लेह गुरुदेव नगर नंदनवन प्लॉट नं. १०२ नागपुर ह. मु. विदया नगर भंडारा (अतिरीक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.क.म फिरते पथक भंडारा ) यांचे लेखी तक्रारी वरुन आरोपीने १७६८ युनिटची किंमती १३,७४१/--रु. चोरी केल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १३५ भा.वि. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक २४/०३/२०१८ ते २७/०३/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही कामावरुन घरी जात असता यातील आरोपी मोटार सायकल चालकाने फिर्यादीस एकटी पाहुण पाठलाग करुन माझे गाडीवर बस माझ्या सोबत चाल? माझे मोबाईल मधील पिक्चर बघ, असे म्हणुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मुलीवर अत्याचार करुन लग्नास नकार देवुन शिवीगाळ करुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक ०१/०३/२०१८ चे २३.०० वाजता पर्यत यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असुन आरोपी याने फिर्यादीस लग्नाचे आमीष दाखवुन दि. ०१/०३/२०१८ चे रात्री २३.०० वाजता दरम्यान घरा मागील गोठयात बोलावुन आरोपीने फिर्यादी सोबत जबरदस्तीने अत्याचार केले व फिर्यादीने आरोपीला माझ्या सोबत लग्न कधी करणार असे हटकले, असता आरोपीने फिर्यादी सोबत लग्न करण्यास नकार देवुन शिवीगाळ करुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७६,४१७,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) एसबीआय खातेमधुन पैसे काढुन ऑनलाईन शापींग करुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक २५/०३/२०१८ चे ०६.०० ते २६/०३/२०१८ चे ०९.०० वाजता पर्यत यातील फिर्यादी यांचे मोबाईल क्र. आरोपीने आपले मोबाईल क्र. वरुन आरोपी धारकाने एसबीआय बॅकेचा मॅनेजर बोलतो आहे, असे सांगुन फिर्यादीला त्याचा एटीएम ब्लॉक झाले आहे. असे म्हणुन सुरु करण्यासाठी एटीएम नंबर व मोबाईलवर फिर्यादीला आलेल्या मॅसेज मधील नंबर विचारुन फिर्यादीचे एसबीआय खाते क्र. मधुन ९८,९९७/--रु. ची ऑनलाईन शापींग केली असल्याने फिर्यादी राजकुमार पुनाजी गराडे वय ५८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड देव्हाडी यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. कंकाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन ग्राहकांची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :--**

दिंनाक १३/०२/२०१२ ते २०/०७/२०१७ पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करुन यालस्को रियल इस्टेट ऍग्रो फार्मीग लि. कंपनी राजनांदगाव द.ग. तसेच यालस्को सेवींग क्रेडीट कोऑपरेटीव सोसायटी लि. राजनांदगाव ब्रॅन्च भंडारा येथील मॅनेजर व कंपनीचे डायरेक्टर व ईतर कंपनी मध्ये काम करणारे नौकरदार वर्गानी ग्राहकांना प्रलोभन दाखवुन तारण पेपरवर पैसे परत करण्याची हमी देवुन ९,२६,७२०/--रु. व ईतर गुतंवणुक करुन फसवणुक केल्याने फिर्यादी जागेश्वर शामराव कुंभरे वय ५० वर्ष, रा. उमरी लव्हारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,४२३,४०९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २७/०३/२०१८ चे ०४.३० वाजता दरम्यान यातील मृतक विशाल अशोक टेकाम वय २४ वर्ष, रा. सडक/अर्जुनी जि. गोंदिया या आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चुकीच्या बाजुने चालवुन विरुध्द दिशेने येत असलेल्या फिर्यादीचे मालकीच्या ऑटो/ टेम्पो वाहन क्र. एमएच ३१ सीक्यु ४१३६ ला समोरुन एनएच–६ रोड मोहघाटा जंगल येथे धडक दिल्याने अपघात होवुन उस्मान शेख, नारायण शाहु हे जखमी झाले तसेच अपघाता नंतर आरोपीच्या ताब्यातील ट्रक अनियंत्रीत होवुन रोडच्या बाजुला असलेल्या झाडाला धडकल्याने पेट घेवुन सदर आगीमध्ये यातील आरोपी हा जळुन मरण पावल्याने फिर्यादी कमलेश व्दारकाप्रसाद वर्मा वय ३३ वर्ष, रा. शितलामाता मंदीर गरिब नवाज नगर उपलवाडी नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०४(अ),२७९ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**७) मोटार सायकलची चोरी :–**

दिंनाक २६/०३/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विद्याधर श्रीराम तुरकर वय ३३ वर्ष, रा. सिहोरा याने आपली लाल– काळया रंगाची हिरो होन्डा पॅशन प्लस मोटार सायकल क्र. एमच ३६ डी ७१६६ किंमती २५,०००/–रु. ची ही रोडचे कडेला ठेवुन रिसेप्शन कार्यक्रमा करीता गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**८) लोखंडी सलाखीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २७/०३/२०१८ चे १९.०० ते १९.३० वाजता दरम्यान यातील जखमी श्रीमती– देवकाबाई नारायण हेडाऊ वय ६५ वर्ष रा. सिहोरा ही घरी चहा बनवित असता यातील आरोपीने तु कशाला चहा मांडली तु लोकांच्या घरी जावुन माझ्या गोष्टी करतेस असे बोलुन तोंडातोंडी भांडण करुन घरातील लहान लोखंडी सलाखीने जखमीचे उजव्या पायाला व हाताच्या अंगठयाला मारुन जखमी केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. जटाळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**९) संगनमत करुन पैसाचे वादावरुन भांडण करुन काचेची बॉटली मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २६/०३/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ सतिश भुरे वय २६ वर्ष, हे आपले पानठेल्यात हजर असतांना यातील आरोपी मोटार सायकल ने पानठेल्यात येवुन खर्रा खरेदी करुन खर्र्याचे पैसे न दिल्याने, फिर्यादीने हटकले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे भावा सोबत तोंडा–तोंडी भांडण करुन खर्र्याचे पैसाचे वादावरुन पानठेल्यातील जिरा सोडयाची काचेची बॉटली दोन्ही आरोपीतांनी उचलुन फिर्यादीस डोक्याचे मागील बाजुस व फिर्यादीचे भाऊ यास डोक्याचे उजवे बाजुस मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१०) क्षुल्लक कारणावरुन विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २७/०३/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रभाकर रामचंद्र बर्वे वय ५४ वर्ष, रा. गांधी वार्ड रोहीदास मंदीरा जवळ भंडारा हा त्याचे आवारातील घराचे मागचे बाजुला असलेल्या सागवनाचे फांदया आपल्या वॉल कंम्पाऊन्ड वॉल वर चढुन छाटत असतांना आरोपीने फिर्यादीस माझ्या आवारात कशाला आला, म्हणुन विटा फेकुन मारल्याने डोक्याला मार लागुन रक्त निघाल्याने तसेच डावे पायाचे गुडग्याला खाली मार लागल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**११) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २७/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही येथे अवैध हातभट्टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९० लिटर हातभट्टी दारु किंमती ७१५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.